# लातूर शहर महानगरपालिका, लातूर

मेन रोड, लातूर

पाणी पुरवठा विभाग

स्थापना 25 ऑक्टोबर 2011 ई-मेल : lmc.waterhod@gmail.com फोन नं. - 02382-246075


जा.क्रं./लाशमनपाला/पा.पु./ 5139 / 2024-25 दिनांक 08 / 08 / 2024

## Work Order

प्रति,

**मे. आर. ॲन्ड बी. इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि.,**
बी / 1, नीला अपार्टमेंट,
मंडपेश्वर इंडस्ट्रियल इस्टेटसमोर,
एस. व्ही. पी. रोड, बोरिवली (प.), मुंबई.

**विषय** - केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 अभियानांतर्गत लातूर शहर वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या कामाचे कार्यारंभ आदेश देणे बाबत.

**संदर्भः** 1. मा. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, औरंगाबाद यांची तांत्रिक मान्यता जा.क्रं. /मुअमजीप्राऔ/तांशा-3/2726/2023 दिनांक 14.09.2023
2. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय क्रं. अमृत-2023/प्र.क्रं.441/नवि-33 दिनांक 14 डिसेंबर 2023
3. प्रशासकीय ठराव कं. 213 दिनांक 02.08.2024
4. या कार्यालयाचे पत्र क्रं. 4775 दिनांक 25.07.2024
5. आपले पत्र दिनांक 31.07.2024
6. आपण दिनांक 08 / 08 / 2024 रोजी लिहून दिलेला करारनामा.

| | |
|---|---|
| **अ) कामाचे नांव** | - लातूर शहरासाठी वाढीव पाणी पुरवठा योजना. |
| **ब) योजनेचे नांव** | - केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 अभियांन |
| **क) अंदाजपत्रकीय रक्कम** | - 217,82,79,400.00 (अक्षरी रु. - दोनशे सतरा कोटी ब्याऐंशी लक्ष एकोणऐंशी हजार चारशे रु. फक्त) |
| **ड) स्विकृत निविदा दर** | - ( +8.80% जास्तीने ) |
| **इ) स्विकृत निविदा दरानुसार कामाची किंमत** | - रु. 236,99,67,987.00 (अक्षरी रु. - दोनशे छत्तीस कोटी नव्यान्नव लक्ष सदोसष्ट हजार नऊशे सत्याऐंशी रु. फक्त) |

वरील संदर्भिय पत्र क्रं. 1 अन्वये केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 अभियांन अंतर्गत लातूर शहर मलनिःस्सारण प्रकल्प कामास तांत्रिक मान्यता मिळाली आहे. संदर्भ क्रं. 2 अन्वये प्रशासकीय मान्यता मिळाली असुन संदर्भ क्रं. 3 अन्वये सदर कामाचे दर मंजुरीचे प्रशासकीय ठराव घेण्यात आला.

निविदेची मुदत कार्यादेश दिलेल्या दिनांकापासुन 24 महिने त्याकरिता कामाची 2 % सुरक्षा अनामत रक्कम संदर्भ क्रं. 4 अन्वये रु. 4,73,99,360/- भरणा करण्याचे कळविले. तद्नंतर संदर्भ क्रं. 5 अन्वये **BHARAT CO-OPERATIVE BANK (MUMBAI) LTD. चे रक्कम रु. 4,73,99,360/- रक्कमेची Bank Guarentee भरणा केलेला आहे.** संदर्भ क्रं. 6 अन्वये आपणासोबत करारनामा झालेला आहे.

1. सदरचे काम केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 अभियांन अंतर्गत घेण्यात आले असुन या कामी शासनाकडुन अनुदान उपलब्धतेनुसार देयके अदा केले जातील. देयक अदा करण्यास विलंब झाल्यास त्यावर कसलाही दंड आकार व्याज लागू राहणार नाही.
2. सुरक्षा रक्कम बिलातून 2% कपात केली जाईल व काम पूर्णत्व प्रमाणपत्रानंतर कामाची स्थिती समाधानकारक असल्याबाबतची खात्री करुन दोष दायित्व कालावधी मधील तरतुदीनुसार ही रक्कम परत केली जाईल.
3. स्विकारण्यात आलेल्या निविदा दरापेक्षा जास्त खर्चाचे देयक मंजुर करण्यास येणार नाही. तसेच सदर कामाकरिता निविदा प्रपत्रातील तरतुदीनुसार भाववाढ अनुज्ञेय राहील.
4. कामाचा कालावधी 24 महिने पावसाळ्यासह राहील.
5. निविदा धारकाच्या चुकीमुळे / हलगर्जीपणामुळे मुदतीत काम पुर्ण न झाल्यास प्रतिदिन निविदेतील तरतुदीनुसार दंडाची आकारणी करण्यात येईल.
6. कामासाठी वापरण्यात येणा-या सर्व साहित्याची चाचणी / तपासणी अहवाल शासकीय तंत्रनिकेतन / शासकीय महाविद्यालय किंवा शासन संलग्न संस्थेकडुन करुन देणे बंधनकारक राहील.
7. सदर योजनेच्या कामाचा योग्य गुणवत्तेचा दर्जा राखुन काम विहित कालावधीत आपण करारनाम्याच्या सोबत सादर केलेल्या बारचार्टनुसार पुर्ण करावे, निविदाधारकाच्या कार्यदोषामुळे सदर कामास कोणतीही वाढीव मुदत दिली जाणार नाही, याची दक्षता घ्यावी.
8. सादर केलेल्या बारचार्टनुसार काम होतात किंवा नाही याबाबत महानगरपालिका, कार्यकारी अभियंता वेळोवेळी आढावा घेतील. दर तीन महिन्यानी योजनेच्या कामाचा सद्यस्थिती दर्शक आढावा घेण्यात येईल.
9. सदर कामाचे मार्क आऊट महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. लाईफ फर्स्ट कॉन्सेप्ट अॅन्ड टेक्नॉलॉजिस प्रा. लि., पुणे (PMC) यांचेकडील नियुक्त अभियंता यांचेकडुन करुन घेवुनच काम सुरु करावे. मंजुर नकाशाप्रमाणे अंदाजपत्रकाप्रमाणे कार्यकारी अभियंता यांचे पर्यवेक्षणाखाली काम करण्याची जबाबदारी निविदाधारक यांची राहील.
10. सदर कामास अग्रीम रक्कम अनुज्ञेय नाही.
11. निविदाधारका मार्फत कामाच्या ठिकाणी व्हिजीट बुक (शेरे पुस्तक) ठेवण्यात यावे व त्यावर अधिकारी, अभियंता, पर्यवेक्षक यांच्या सुचना नोंदवुन त्यानुसार काम करावे.
12. मा. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, छ.संभाजी नगर यांचेकडील तांत्रिक मंजूरी जा.क्रं./तांशा-3/2726/14.09.2023 अन्वये (एकुण 259.22 कोटी तात्रिक मान्यता प्राप्त) अन्वये प्रकल्पाची तांत्रिक मंजुरी व मा. उपसचिव, शासन निणर्य क्रमांक:- नगरी-2023/प्र.क्र.441/नवि-33 मंत्रालय मुंबई - 400 032 दि. 14 डिसेंबर 2023 अन्वये (259.22 कोटी) प्रशासकीय मान्यता प्राप्त अन्वये प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता तसेच तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता यामधील अटी व शर्तीचे पालन करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.
13. निविदाधारकाच्या देयकाची रक्कम महानगरपालिकेकडे सदर कामासाठी असलेल्या निधीच्या उपलब्धतेनुसार अदा करणेत येईल, देयक प्रदान करणेच्या विलंबामुळे देयक रकमेवर कोणत्याही स्वरुपाचे व्याजाची मागणी निविदाधारकास करता येणार नाही किंवा त्यावर व्याज मिळणार नाही.

14. करारनामा हा लातूर कोर्टाच्या न्यायक्षेत्राशी बांधील राहील, करारनाम्यास लवादाचा अधिनियम लागू नसून कोणत्याही प्रकारचा लवाद नेमण्यात येणार नाही, मा. आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका, लातूर यांचा निर्णय अंतिम व सर्वावर बंधनकारक राहील.
15. निविदाधारकाने कार्यारंभ आदेश मिळाल्यापासून 15 दिवसांच्या आत कामाच्या कार्यवाहीचा बार चार्ट सादर करावयाचा असून त्यास बांधील असलेबाबतच्या जबाबदारीचे पत्र सादर करावयाचे आहे. सदर कामाच्या कार्यावाहीनुसार काम करण्यास निविदाधारक असमर्थ ठरल्यास निविदेतील कामाच्या विलंबाबाबतच्या अधिनियमानुसार सदर निविदाधारकावर दडांत्मक कार्यवाही करणेत येईल.
16. निविदाधारकाने संबंधित कामाचा प्रत्येक पंधरवाड्याचा प्रगती अहवाल छायाचित्रिकरणासह प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार व महानगरपालिका यांना सादर करावयाचा आहे.
17. काम सुरु झाल्याच्या दिनांकापासून प्रत्यक्ष होणा-या कामाची दैनंदिन नोंदवही (मोजणी पुस्तक) ठेवण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहिल.
18. करारनाम्यातील सर्व अटी व शर्तीचे पालन करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.
19. सदर निविदेची प्रमाणित प्रत या सोबत देणेत येत आहे.
20. काम सुरु करण्यापूर्वी कामाचा सर्वेक्षण करणे बंधनकारक राहील.
21. प्रत्येकी 03 महिन्यात प्रगती दर्शविणारा बारचार्ट सादर करणे बंधनकारक राहील.
22. करारनाम्यानुसार विहित मुदतीत काम पूर्ण करणे बंधनकारक राहील.
23. सदर कामाचा जीएसटी स्वतंत्र अदा केला जाईल.
24. कोणत्याही प्रकारची मुदत वाढ देण्यात येणार नाही. (अपवादात्मक परिस्थीती वगळता)
25. सदर काम विहित मुदतीत पूर्ण न केल्यास या बाबतची संपूर्ण वसुली आपणाकडून करण्यात येईल किंवा सदर काम न केल्यास अपूर्ण काम दुस-या कंत्राटदारास देऊन सदर काम पूर्ण करुन घेण्यात येईल आणि या नुकसानीच्या फरकाची भरपाई आपणाकडून वसूल करण्यात येईल.
26. कामाच्या संबंधात काही वाद निर्माण झाल्यास अंतीम निर्णय आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका, लातूर यांचे राहील व तो आपणास बंधनकारक राहील.
27. निधीच्या उपलब्धतेनुसार देयकाची अदायगी करण्यात येईल. त्यावर कोणत्याही प्रकारचा युक्तीवाद किया आक्षेप स्विकारल जाणार नाही.
28. काम सुरु करणेपुर्वीचे फोटो व काम पूर्ण झालेनंतरचे फोटो सादर करणे बंधनकारक राहील. त्याशिवाय देयकाची अदायगी केली जाणार नाही.

(बाबासाहेब मनोहरे)
**आयुक्त**
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

**प्रत -**

1. कार्यकारी अभियंता, लातूर शहर महानगरपालिका, लातूर यांना देऊन आदेशित करण्यांत येते की, नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यांत यावे.
2. मे. लाईफ फर्स्ट कॉन्सेप्ट ॲन्ड टेक्नॉलॉजिस प्रा. लि., पुणे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव देण्यात येते.